**बाब**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ संचालक मंडळाच्या मंजुरीसाठी सादर**

| | | |
|---|---|---|
| **सादर कर्ते** | : | **महाव्यवस्थापक (वाहतूक)** |
| **खाते** | : | **वाहतूक खाते** |
| **सादर केल्याची तारीख** | : | **एप्रिल २०२५** |

---

**विषय:- महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमअंतर्गत फ्लेक्सी फेअर (लवचीक भाडे) आकारणीबाबत प्रस्ताव.**

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमअंतर्गत समाविष्ट रा.प. महामंडळाच्या विविध मुद्दयांमध्ये महसुल वाढ अंतर्गत फ्लेक्सी फेअर (लवचीक भाडे) करणेबाबत मुद्दा अंतर्भुत करण्यात आला आहे. तसेच सदर बाबतीत प्रस्ताव सादर करणेस्तव मा. मंत्री परिवहन तथा अध्यक्ष रा.प. महामंडळ यांनी निर्देश दिले आहेत.

फ्लेक्सी फेअर (लवचीक भाडे) आकारणीबाबत रा.प. महामंडळाचे प्रकल्प सल्लागार मे. के.पी.एम.जी यांना अहवाल तयार करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दिनांक १२.०२.२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये दिवसाच्या वेळेतील प्रवासी गर्दीची वेळ (सकाळी ६.०० ते १०.०० व संध्याकाळी १७.०० ते २१.००) अशी व कमी गर्दीची वेळ (सकाळी ११.०० ते १६.००) अशी गृहीत धरुन त्यानुसार Time Based Prising Strategis प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि अशा प्रकारे प्रवासाचे वेळेनुसार भाडेआकारणी करणे संयुक्तीक होणार नाही. कारण रा.प. महामंडळाची वाहतूक सेवा विविध सेवा प्रकारात उदा. ग्रामिण मार्ग, लांब व मध्यम लांब पल्ला मार्ग, शालेय वाहतूक, बीएमटीसी, आंतरराज्य सेवा अशा विविध प्रकारात चालनात आहे. तसेच ब-याचदा प्रशासकीय नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे, वाहतूक कोंडीमुळे फे-यांना नियोजित वेळेवर सुटण्यास विलंब होतो. अशा वेळी Time Based Prising Strategis वापर करणे अडचणीचे होईल.

फ्लेक्सी फेअर आकारणीचा उद्देश हा रा.प. महामंडळाचा कमी गर्दीच्या हंगामात महसूल वाढविणे व प्रवाशी संख्या वाढविणे हा आहे. तसेच फ्लेक्सी फेअर हे रा.प. सेवेची गुणवत्ता सुधारण्यात व स्पर्धात्मक वाहतूक पर्यायांच्या पार्श्वभुमीवर रा.प.ची व्यवहार्यता टिकवून ठेवण्यात मदत करेल.

कमी गर्दीचे कालावधीत प्रवास करणा-या प्रवाशांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने प्रायोगिक तत्वावर फ्लेक्सी फेअर लागू करणे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमअंतर्गत रा.प. महामंडळातील सद्यस्थितीतील चालनातील मुंबई-पुणे मार्गावरील ११५ शिवनेरी बसेस करीता फ्लेक्सी फेअर (लवचीक भाडे) पद्धतीने भाडेआकारणी करणे प्रस्तावित करण्यात आले होते.

शासकीय अधिसुचना, गृहविभाग क्रमांक एसटीसी ३४०६/प्र.क्र.७१/परि-१, दिनांक २०.१०.२००६ मधील सुधारणेप्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास यात्रा, सणासुदीचा काळ, सुट्टया, सप्ताह अखेर अधिकतम गर्दी अथवा घाई-गर्दीचा कालावधी या दरम्यान राज्य परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिल्याप्रमाणे ३०% इतक्या मर्यादेपर्यंत भाडे कमी करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

या तरतूदीच्या आधारे शिवनेरी बससेवेचे प्रवासभाडे लवचीक पद्धतीने आकारणीबाबत यापुर्वी सन २०१९ मध्ये महामंडळ ठराव क्र.२०१९:०८:०३ दि.३०.०८.२०१९ नुसार कमी गर्दीच्या हंगामात शिवनेरी बससेवेचे प्रवासभाडे २५.६४% ने कमी करण्यास मंजुरी देण्यात आली होती. तसेच सदरची सवलत पुढे कायमस्वरुपी ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे.